|| श्री गजानन प्रसन्न ||
|| श्री केशवराज प्रसन्न ||

Book Packet Containing Periodical

R.N.I. No. : MAHMAR/2000/4869

आपली आहे प्रगतीची

# वाटचाल

✲ वर्ष १६ वे, अंक ३ ✲ दि. १५ सप्टेंबर २०१६ ✲ किंमत रु. २०/-

website : www.deodharmandal.org
kulvruttant website : deodharmandal.org/kul



देवधर-दीक्षित-ढमढेरे कुलबंधु भगिनींना
विजयादशमी व दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

# देवधर मंडळ कार्यकारिणी (१/४/२०१६ ते ३१/३/२०१९)

## अध्यक्ष

**सुरेश विश्वनाथ देवधर** (कु. वृ. पान. २१)
१०२, आय् विंग, प्रणयनगर, राम मंदिर रोड (विस्तारित),बाभई,
बोरीवली (प.), मुंबई-४०००९१. दूरध्वनी : ०२२/२८९८१८५६.
मोबाईल : ९२२३३६६६४०, ९२२३५०६९८८
e-mail : suresh.deodhar@gmail.com

## उपाध्यक्ष

**वासुदेव नारायण देवधर** (कु. वृ. पान. ४९७)
सी-३/१०२, सॅटेलाईट क्लासिक, रेल्वे स्टेशन जवळ,
गुंफा रोड, जोगेश्वरी (पूर्व) मुंबई-४०००६०
दूरध्वनी २८२६१०२८,२८२४६०४२

**डॉ. सुनिल गोपाळ देवधर** (कु. वृ. पान. ३१०)
वैनतेय, प्लॉट नं. ३८, प्रेस्टिज पार्क, घाडगे नगर,
नाशिक रोड, नाशिक ४२२१०१. फोन : (०२५३)२४६४७८०
मोबाईल : ९८५०६५४२५०
e-mail : deodharsunil@rediffmail.com

## कार्यवाह

**सौ. सरिता मुकुंद देवधर** (कु.वृ.पान ३५९)
११, रामकृष्ण भुवन, गोरेगावकर बिल्डिंग नं. ६,
गिरगाव, मुंबई-४००००४ दूरध्वनी ०२२/२३८९३९३०
मोबाईल : ९८२०६५९४४७
e-mail : saritadeodhar50@gmal.com

## सहकार्यवाह

**महेंद्र सदाशिव देवधर (स्वीकृत)**
(पुणे विभाग कार्यवाह)
७०६, सिटी क्राऊन, कर्वे पुतळयाजवळ, कोथरूड,
पुणे-४११०३८. मोबाईल :९८८१२९९५९७
e-mail : mahendradeodhar@gmail.com

## कोषाध्यक्ष

**अकल्पिता चिंतामणी देवधर** (कु. वृ. पान. ८९८)
देवधर हाऊस, दत्त आळी, गांवदेवी चौक, कल्याण (पश्चिम)
मोबाइल : ९८२०३५६४१३
e-mail : cdakalpita@yahoo.co.in

## वाटचाल

**आशिष राम देवधर** (कु. वृ. पान. ३१)
अतिथी संपादक, वाटचाल
सी/२५, सुरांकित, सिद्धेश्वर आळी, पारनाका,
कल्याण (प.) ४२१३०१ दूरध्वनी : ०९८३३५११५९३
e-mail : ashish.ram.deodhar@gmail.com

## सभासद

**नारायण(दिलीप)गोविंद देवधर** (कु.वृ.पान ४१८)
बी-१०३ RNA हाईटस्, जोगेश्वरी-विक्रोळी जोड मार्ग
(लिंक रोड),अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००९३.
दूरध्वनी: ०२२/२८२५२१४५ मोबाईल : ९८१९९७२५११
e-mail : deodhardilip@yahoo.com

**अविनाश दिवाकर देवधर** (कु. वृ. पान. ९६७) **(स्वीकृत)**
२, लक्ष्मी विनायक सोसा., मंजुनाथ शाळेशेजारील गल्ली, पाथर्ली,
डोंबिवली (पूर्व) दूरध्वनी ०२५१-२४४५२६२
मोबाइल : ९२२४२६४९६९
e-mail : avinash.deodhar@gmail.com

**रविश देवधर** (कु. वृ. पान. २०२)
ब्लॉक नं. २, आर्य अपार्ट., तळमजला, मराठी शाळेच्या मागे,
पोस्ट - रावतळे, चिपळूण, रत्नागिरी-४१५६०५
दूरध्वनी : ९४२११८९४३५०

**मधुसूदन दत्तात्रेय देवधर** (कु.वृ.पान ५३१) **(स्वीकृत)**
११५२,'राधाकृष्ण' सुभाष नगर, १ ली गल्ली, शुक्रवार पेठ,
पुणे-४११००२, दूरध्वनी ०२०-२४४७८१६०

**नितेश नारायण देवधर** (कु. वृ. पान. ४७३)
फ्लॅट नं. १२, भारत सावली अपार्ट.२ रा मजला, कल्पतरु टॉवर
समोर, सखाराम कॉम्प्लेक्स, डोंबिवली (प.)
मोबाइल : ९००४१९८९०३
e-mail : nitesh.devdhar@gmail.com

**विष्णू विनायक देवधर (स्वीकृत)** (कु.वृ.पान ४३९)
बी-४, रूम नं. ३, सप्तर्षी सोसायटी, पांडुरंग वाडी, आनंदनगर,
मानपाडा रोड, डोंबिवली (पू.)४२१२०१
दूरध्वनी ०२५१-२८०१८३०, मोबाईल ९८३३१५३९८९
e-mail : vishnu.deodhar9999@gmail.com

## विशेष निमंत्रित

**गणेश शंकर देवधर** (कु. वृ. पान. ३६०)
प्लॉट नं. ५, पारिजात, ४ सी, रूम नं. ५, नागरी निवारा, गोरेगांव
(पूर्व), मुंबई ४०००६३
दूरध्वनी- ९९२०३५६४४४
e-mail : gsdeodhar43@gmail.com

## पदसिद्ध सभासद

**पुरुषोत्तम गोपाळ देवधर** (कु. वृ. पान. ३६०)
ब्लॉक नं. २, भागीरथी टॉवर्स, स.नं. ६, हि. नं. ११,
कोकण एक्सप्रेस, हॉटेल लेन, कोथरुड पुणे-४११०३८
दूरध्वनी- ९८६०३०६३४४, ०२०/२५४५६७५०
e-mail : pgdeodhar@gmail.com

## मानद लेखा परीक्षक

**किरण अनंत देवधर** (कु. वृ. पान. १६२)
१८ ई स्केअर, स्टेट बँकेच्या वर, शहाजी राजे मार्ग,
विलेपार्ले (पू.), मुंबई ४०००५७ मोबाइल :९८२०३३५०९३

# अध्यक्षीय मनोगत

७ ऑगस्ट २०१६ रोजी डोंबिवली येथे झालेल्या ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत २०१६ ते २०१९ या तीन वर्षांसाठी नवीन कार्यकारिणी बिनविरोध निवडून आली. त्याबद्दल सर्व सभासदांचे मन:पूर्वक अभिनंदन. तसेच या कार्यकारिणीत श्री. महेंद्र देवधर (पुणे) आणि श्री. विष्णु देवधर (डोंबिवली) या नवीन तरुण सभासदांचा समावेश झाला आहे. त्यांचे स्वागत.

कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक यांचे तपशील अंकात आहेत.

या नवीन कार्यकारिणीतर्फे मी मंडळाचा अध्यक्ष म्हणून आपणा सर्वांना अभिवादन करीत आहे. कोणत्याही संस्थेचे कार्य एकमेकांच्या सहकार्याने आणि सर्वांच्या समावेशाने होत असते. संस्थेच्या पुढील वाटचालीसाठी कार्यकारिणीतील आपणा सर्वांचा सहयोग-सहकार्य अपेक्षित आहे.

त्यासाठी आपण सतत एकमेकांच्या संपर्कात राहणे जरुरीचे आहे. म्हणून आम्ही कार्यकारिणीच्या मंडळातील सभासदांनी व्हॉट्स ॲप ग्रुप तयार केला आहे. त्यामुळे कोणीही सभासद सर्वांशी एकाच वेळी संवाद साधू शकतो. प्रत्येकाचे मत लगेच कळते.

असेच ग्रुप ठिकठिकाणी असावेत या आमच्या आवाहनाला ठाण्यातून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. 'ठाणे' ग्रुप सुद्धा तयार झाला आहे. नाशिक येथेही होत आहे. डोंबिवलीतील ग्रुप आधीपासूनच कार्यरत आहे. आपणही आपल्या जवळपासच्या देवधरांचा ग्रुप तयार करून एकमेकांना भेटून आपल्या सूचना, आपले कार्य, आपण मिळविलेल्या यशाची माहिती एकमेकांना व मंडळाला कळवाव्यात असे आवाहन आहे.

हे संगणक युग आहे. कोणतेही काम झटपट, कमी श्रमात, कमी खर्चात व्हावे यासाठी आज सरकारही अनेक कामे ऑनलाईन करीत आहे आणि नागरिक त्या सुविधांचा लाभ घेत आहेत. आपणही या सुविधांचा वापर आपल्या मंडळाच्या कामासाठी मंडळाची व्याप्ती वाढविण्यासाठी करून घेऊ.

आपल्या अनेक उपक्रमांमधील एक उपक्रम म्हणजे 'वाटचाल'. आपण सर्व या आपल्या त्रैमासिकाचे सभासद आहात. हे त्रैमासिक आपणापर्यंत पोहोचत असेलच. नसल्यास आपल्या नवीन पत्यानिशी आपण आमच्याकडे संपर्क साधावा. तसेच आपण 'वाटचाल' मंडळाच्या वेबसाईटवरही वाचू शकता.

त्रैमासिकात प्रसिद्ध करण्यासाठी आपण आपले साहित्य ईमेलद्वारे पाठवू शकता.

संगणक इंटरनेटच्या आधारे आपली वेबसाईट चालू आहेच. सध्या त्यावर आपला कुलवृत्तांतही समाविष्ट करण्याचे काम सुरू आहे. आपली, आपल्या कुटुंबियांची अद्ययावत माहिती त्यात असावी यासाठी वेबसाईटवर एक फॉर्म देण्यात येतो. तो आपण सर्वांनी भरून द्यावा ही विनंती. कुलवृत्तांताविषयी सविस्तर माहिती याच अंकात दिलेली आहे.

मंडळाची व्याप्ती वाढावी, अधिकाधिक लोक मंडळाशी जोडले जावेत, एकमेकांशी जोडले जावेत, मंडळाच्या उपक्रमात अधिकाधिक सभासदांनी भाग घ्यावा यासाठी नवीन उपक्रम सुरू करावेत असा मानस आहे, वेळोवेळी ते जाहीर करूच. आपल्याही सूचनांचे स्वागत आहे.

यावर्षीचे वार्षिक स्नेहसंमेलन पुणे येथे दिनांक २१ व २२ जानेवारी रोजी आयोजित केले आहे. अजून भरपूर वेळ आहे. मुद्दामहून आत्ताच तारीख जाहीर करीत आहोत जेणेकरून आपण आधीपासून ठरवून जास्तीत जास्त संख्येने हजर राहू शकाल. वर म्हटल्याप्रमाणे आपण आपल्या जवळपासच्या लोकांशी फोन, व्हॉट्‌ह ॲप वरून संपर्क साधाल व एकत्रितपणे संमेलनाला याल ही आशा आहे. संमेलनाविषयी सविस्तर माहिती डिसेंबऱ्या वाटचालमध्ये येईलच.

नुकताच ऑलंपिक २०१६ हा सोहळा पार पडला. त्यामध्ये पदकविजेत्या साक्षी, सिंधू तसेच उत्कृष्ठ कामगिरी केलेल्या दीपा कर्माकर या सर्वांचे हार्दिक अभिनंदन!

गौरी-गणपती सण नुकताच संपन्न झाला. आता वेध लागले लवकरच येणाऱ्या नवरात्रोत्सवाचे आणि त्यानंतर येणाऱ्या दिवाळीचे.

आपणा सर्वांना नवरात्री व दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

- सुरेश विश्वनाथ देवधर

~~- अध्यक्ष~~

## वार्षिक स्नेहसंमेलन

आपल्या देवधर-दीक्षित-ढमढेरे कुलांचे वार्षिक स्नेहसंमेलन येत्या जानेवारी २०१७ मध्ये दि. २१ जानेवारी २०१७ सायं. ५.३० ते ९.३० आणि २२ जानेवारी सकाळी ९.३० ते ४.०० या वेळात गणेश हॉल, कोथरूड येथे संपन्न होणार आहे. कार्यक्रमाची रूपरेषा डिसेंबर २०१६ च्या वाटचाल मध्ये आपण पाहू शकाल. तसेच ती आपल्या वेबसाईटवरही असणार आहे. परंतु आपल्याला या दोन तारखा आधी कळल्याने आपण त्या मंडळासाठी राखीव ठेवू शकता. तशी आपण आपली कामे ॲडजेस्ट करू शकता यासाठी त्या कळवीत आहोत. पुणे विभागाचा तीळगूळ समारंभही त्यात संपन्न होणार आहे.

## मुंबई विभागाचा तीळगूळ समारंभ

मुंबई विभागचे तीळगूळ संमेलन दि. १५ जानेवारी २०१७ रोजी ठाणे पूर्व येथील जिजामाता सभागृहात होणार आहे. तरी मुंबई विभागातील कुलबंधु-भगिनींनी हा दिवस मंडळासाठी नक्कीच राखून ठेवावा ही आग्रहाची विनंती.

मंडळाच्या वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रमातील कुलबंधु-भगिनींची वाढती उपस्थिती ही कार्यकारिणीचा उत्साह वाढवणारी आहे. आपल्या सहकार्याशिवाय मंडळ कार्यरत राहणे शक्य नाही. तेव्हा आपण या संमेलनांना अवश्य यावे ही विनंती.

***- अध्यक्ष, देवधर मंडळ***

# ४० व्या वार्षिक सभेचा लघुवृत्तांत

देवधर मंडळाची ४० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ७ ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी १०.३० वाजता कानविंदे सभागृह डोंबिवली येथे संपन्न झाली. सभेला ४० सभासद उपस्थित होते. प्रथम दीप-प्रज्ज्वलन होऊन श्री केशवराज पूजन झाले. दिवंगताना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यवाहांचा वार्षिक अहवाल, आयव्ययपत्रक, व ताळेबंद मंजुरी, लेखापरीक्षकांची नेमणूक, २०१६-१७ चे अंदाजपत्रक हे विषय सर्व सभासदांसमोर मांडण्यात आले. एकमताने सर्व विषयांना मंजुरी मिळाली. त्यानंतर वयाची ७५ वर्षे पूर्म केलेल्या उपस्थित कुलबंधु-भगिनींचा तसेच विवाहास ५० वर्षे पूर्ण झालेल्या दांपत्यांचा सत्कार करण्यात आला. १० वी, १२ वी व विशेष प्रावीण्य मिळविणाल्या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.

त्यानंतर मंडळाची त्रैवार्षिक निवडणूक व्हायची होती. परंतु आलेल्या अर्जांपैकी फक्त आठ सभासदांचे अर्ज वैध असल्यामुळे नियमानुसार निवडणूक न होता, सर्व आठ सभासद कार्यकारिणीवर निवडून आल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांनी जाहीर केले. नवीन कार्यकारिणी सभासदांची ओळख करून देण्यात आली. चार सभासदांना स्वीकृत करून कार्यकारिणीत समाविष्ट करून घेण्यात आले.

श्री अविनाश देवधर यांनी वाटचालमधील (उद्योजकांसंबंधीच्या लेखांच्या) आवाहनाला मिळालेल्या प्रतिसादाची माहिती दिली. तसचे श्री. सुरेश देवधर यांनी मंडळाच्या वेबसाईट व कुलवृत्तांतासंबंधी माहिती दिली. आभार प्रदर्शनानंतर सभा समाप्त झाली.

त्यानंतर सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला.

- सौ. सरिता मुकुंद देवधर
÷कार्यवाह

***

## पत्ता बदलला असेल तर

आपला किंवा आपल्या नातेवाईकांचा, ओळखीच्या कुलबंधू-भगिनींचा पत्ता बदलला असेल तर तो वाटचालकडे जरूर पाठवावा. अपुरा पत्ता अथवा पत्ता सापडत नाही असा शिक्का मारून पोष्टातून परत आलेल्या नावावरील अंक पाठविणे बंद केले जाते.

कृपया पत्ता बदलल्याचे कार्यकारिणीकडे कळवून मंडळास सहकार्य करावे. त्यांचा पत्ता कार्यकारिणी सभासदांची यादी ज्या पानावर छापली आहे त्यावर आहेच.

अंक पाठविणे थांबविण्यापेक्षा तो योग्य हाती पोहोचविण्यात मंडळास जास्त आनंद वाटतो.

धन्यवाद!

-संपादक

# कुलवृत्तांताविषयी

मंडळाच्या कुलवृत्तांताची पहिली आवृत्ती १९६७ साली प्रसिद्ध झाली. त्यानंतर १९९२ साली कुलवृत्तांताची सुधारित आवृत्ती प्रसिद्ध झाली. २००७ मध्ये कुलवृत्तांत सी.डी. स्वरुपात प्रसिद्ध झाला.

कुलवृत्तांत हा घराण्याचा इतिहास असतो. कर्तृत्ववान पूर्वजांचा सर्वांनाच अभिमान असतो. आपल्या देवधर-दीक्षित-ढमढेरे घराण्यातील अनेकांनी आपल्या काळात आणि क्षेत्रात दैदिप्यमान यश संपादन केले. आजही अनेक कुलबंधु-भगिनी आपापल्या क्षेत्रात प्रावीण्य मिळवीत आहेत, उज्वल यश मिळवीत आहे. या सर्वांची माहिती संग्रहित करून ठेवणे हे आपले कर्तव्य आहे. त्यासाठी आपला कुलवृत्तांत अद्ययावत ठेवला पाहिजे.

आजच्या काळात पुस्तकरुपाने कुलवृत्तांत प्रसिद्ध करणे अतिशय अवघड काम आहे. संगणकयुगात हे काम संगणकाच्या साहाय्याने करू शकतो. तसे काम आपण सुरूही केलं आहे त्याबद्दल ही माहिती

पुण्याचे श्री. रवी ओक (वय वर्षे ७५) यांनी अनेक कुलांचा इतिहास 'वेबसाईट' च्या स्वरुपात तयार केला आहे. www.kulvrittant.in या वेबसाईटवर आपण तो पाहू शकतो. आपला देवधर कुलवृत्तांतही त्यांनी त्याच साईटवर data-base स्वरुपात तयार केला आहे. यात दहा घराण्यातील दहा-बारा पिढ्यांची (१००० पेक्षा जास्त व्यक्तिंची) माहिती त्यात समाविष्ट आहे. ती पाहणे थोडे क्लिष्ट आहे. पण थोडा वेळ काढून तो कसा पाहायचा, त्यात आपली माहिती कशी समाविष्ट करायची हे समजणे सहज शक्य आहे.

या कामी आपल्या एक कुलभगिनी मनिषा देवधर-नवरे (चिपळूण येथील माहेरवाशिण) यांनी पुढाकार घेऊन हे काम करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. आत्तापर्यंत सुमारे १०० व्यक्तिंची माहिती त्यांनी पाठविलेल्या लेखी माहितीनुसार अद्ययावत केली आहे. त्यांचा पत्ता

सौ. मनिषा अमेय नवरे, सी-१०३, श्री सिद्धी कॉम्प्लेक्स, हॉटेल उडिपीविहार जवळ, विश्वेश्वरनगर रोड, टिळकनगर, गोरगांव (पू.) मुंबई - ६३. मोबाईल - ९७६९७१७९३४. manisha_cd@yahoo.com, deodharmanisha.c@gmail.com

संपर्काची वेळ - दुपारी २.०० ते ८.००

या सगळया गोष्टींसाठी आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे.

## मंडळाची आधुनितेकडे वाटचाल

आपले त्रैमासिक 'वाटचाल' हे आपल्या कुलबंधु-भगिनींशी असणाऱ्या संपर्काचे प्रमुख साधन दिवसेंदिवस अधिक वाचनीय करण्याचा आपण सर्वांनी प्रयत्न करुया. त्यासाठी आपल्या कथा, कविता, लेख, निबंध, प्रवासवर्णने इ. साहित्य वाटचालच्या संपादकांकडे किंवा कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांकडे पाठवावे. योग्य त्या साहित्यास नक्की प्रसिद्धी दिली जाईल.

आता आपण साहित्य ईमेल द्वारे पाठवू शकता. सर्वांचे ईमेल पत्त्यांच्या यादीत आहेत.

**- सुरेश विश्वनाथ देवधर**

अध्यक्ष

# डॉ. हर्षदा व डॉ. प्रसाद देवधर यांच्या भगीरथ प्रतिष्ठानची झी मराठीच्या 'उंच माझा झोका पुरस्कारा' साठी निवड

समाजासाठी देत असलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील काही कर्तृत्तवान महिलांचा तसेच एका सामाजिक संस्थेला दरवर्षी झी मराठी तर्फे उंच माझा झोका पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यावर्षी एकूण आठ पुरस्कारांमध्ये एक पुरस्कार डॉ. हर्षदा व डॉ. प्रसाद देवधर या मूळच्या मुंबईच्या परंतु आपले बरेचसे आयुष्य सिंधुदूर्ग जिल्ह्यातील उपेक्षित समाजासाठी वेचणाऱ्या दांपत्याच्या भगीरथ ग्रामविकास प्रतिष्ठानला प्राप्त झाला आहे.

कोकणात गृहिणींच आरोग्य, पर्यावरण आणि रोजगार यांबरोबरच ग्रामस्वच्छता आणि ग्रामविकासाचे ध्येय घेऊन काम करणारे ध्येनिष्ठ दांपत्य म्हणजे डॉ. प्रसाद देवधर आणि डॉ. हर्षदा देवधर. या डॉक्टर दांपत्याने आपला डॉक्टरी पेशा सांभाळत असतानाच सकमाजेसेवेचं आणि ग्रामविकासाचं व्रत अंगीकारलं आणि गावाच्या विकासासाठी भगीरथ ग्रामविकासाची स्थापना केली. आज भगीरथ ग्रामविकासाच्या विविध योजना राबवत असताना त्यांनी जिल्ह्यातील सुमारे पाच हजार घरे धुरमुक्त केली आहेत. बायोगॅस प्रकल्पाबरोबरच ग्रामविकासाच्या विविध योजना त्यांनी राबविल्या आहेत.

डोंबिवली येथे सन २०१२ मध्ये झालेल्या वार्षिक स्नेहसंमेलनात उभयतांचा सत्कार आपण केला होता. त्यावेळी प्रतिष्ठानच्या त्यांच्या कार्याची सविस्तर माहितीही त्यांनी दिल्याचे वाचकांच्या स्मरणात असेल.

डॉ. हर्षदा व डॉ. प्रसाद देवधर यांचे मंडळातर्फे मन:पूर्वक अभिनंदन. त्यांच्या कार्यात त्यांना नेहमीच यश मिळो ही केशवराजाच्या चरणी प्रार्थना.

***

---

## अभिनंदन


### सायली अतुल देवधर चे सुयश

ठाणे येथील आपली कुलभगिनी कु. सायली अतुल देवधर(कु. वृ. पान ८९८), महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या काशिबाई नवले महाविद्यालयामधून फिजिओथेरपीची पदवी परीक्षा नुकतीच उत्तीर्ण झाली असून या परीक्षेत तिने ६९% गुण संपादन केले आहेत.

### कु. जाज्वल्य जोशी चे सुयश

कल्याण मधील आपली माहेरवाशिण सौ. अर्चना राजन जोशी (कु. वृ. पान ८९८), यांचे कनिष्ठ चिरंजीव कु. जाज्वल्य राजन जोशी सिव्हिल इंजिनिअरिंगची पदवी परीक्षा विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाला असून त्यास ७८% गुण प्राप्त झाले आहेत.

# श्री. मिलिंद प्रभाकर ढमढेरे यांना पी. एच. डी.



ज्येष्ठ क्रीडा पत्रकार व दै. लोकसत्तामधील वरीष्ठ उपसंपादक श्री. मिलिंद प्रभाकर ढमढेरे यांना टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे नुकतीच पी. एच. डी. जाहीर करण्यात आली आहे.

वृत्तपत्रविद्या शाखेत त्यांना ही पदवी देण्यात आली. The Golden quest for India in Olympic games with reference to performance after 1984 हा त्यांचा पी. एच. डी. चा विषय होता. ज्येष्ठ पत्रकार श्री. अरविंद व्यं गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हे संशोधन केले. भारतीय खेळाडू ऑलंपिकसारख्या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत पदक मिळविण्यात अपयशी ठरतात त्यामागील कारणे व उपाययोजना या विषयावर श्री. ढमढेरे यांनी आपल्या प्रबंधात सविस्तर मुद्दे मांडले आहेत. ढमढेरे हे गेली ३६ वर्षे क्रीडा पत्रकारिता या क्षेत्रात कार्यरत आहेत. आत्तापर्यंत त्यांनी क्रीडाविषयक अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत.

मंडळातर्फे श्री. मिलिंद ढमढेरे यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

# कु. ऋचा मिलिंद ढमढेरे



पुणे येथील कु. ऋचा मिलिंद ढमढेरे दि. इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज इन इंडिया यांचेतर्फे घेतल्या जाणाऱ्या प्रोफेशनल प्रोग्रॅम एक्झामिनेशन अर्थात सी. एस्. च्या परीक्षेत चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झाली आहे. कु. ऋचा हिचे हार्दिक अभिनंदन.

# कु. दीप सुनिल देवधर

आपल्या मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्री. सुनिल देवधर यांचा सुपुत्र कु. दीप हा नुकताच फिजिओथेरपीची परीक्षा उत्तीर्ण झाला आहे. तो IELTS ही परीक्षासुद्धा उत्तीर्ण झालेला आहे.

# कु. आदिती देवधरचे सुयश

बंगळूर येथे राहणारी कु. आदिती पराग देवधर (अध्यक्ष श्री. सुरेश देवधर यांची नात) ही यंदा दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाली असून तिला ९५% गुण प्राप्त झाले आहेत.

मंडळातर्फे सर्व यशस्वीतांचे मन:पूर्वक अभिनंदन व भावी वाटचालीसाठी शुभेच्छा!

# येथे भान हरावे

**रेखीव गणेशमूर्ती आणि पेण हे एक अतूट नातं आहे. पेण येथे अनेक घरांमधून गणेशमूर्ती बनविण्याचा व्यवसाय चालतो. त्यातील एक अग्रणी नांव म्हणजे श्री. राजाभाऊ देवधर. त्यांच्या चार पिढया गेली १०० वर्षाहून अधिक काळ या व्यवसायात आहेत. सध्या राजाभाऊंचे चिरंजीव श्री. आनंद देवधर हे व्यवसाय पाहात आहेत. दै. लोकसत्ताच्या चतुरंग पुरवणीमध्ये संपदा वागळे यांनी त्यांच्याशी, त्यांच्या कारागिरांशी बोलून लिहिलेला लेख प्रकाशित केला आहे. संक्षिप्त रुपात वाचकांसाठी तो साभार देत आहोत.**

- संपादक

देवधर घराणं कलाकारांचं. गणपती बनविण्याची त्यांची परंपरा शंभर वर्षांची जोडलेल्या ग्राहकांची ही चौथी पिढी. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात कोकणातून पोट भरण्यासाठी म्हणून अनेक मंडळी मुंबई-पुण्याकडे आली. भिकाजीपंत देवधर हे त्यापैकी एक. मात्र कोण्या नातेवाईकामुळे शहराकडे न जाता ते पेण येथे आले, गणपती करावयास शिकले. अशाप्रकारे देवधरांच्या घरात गणरायाने जे बस्तान बसवलं ते आजतागायत तसंच आहे. त्यांनी रचलेल्या या पायावर कळस चढवला तो त्यांच्या तिसऱ्या पिढीतील राजाभाऊ देवधर या प्रतिभेचा स्पर्श लाभलेल्या कलावंताने.

आनंद देवधर म्हणाले, ''मूर्ती बनविण्यासाठी साचा तयार करताना रबराचा उपयोग करण्याची मूळ कल्पना प्रथम दादांना (राजाभाऊंना) सुचली. आणि त्यांनी अथक परिश्रमांनी रबराचा साचा बनविला. आजही साचा बनविण्याची तीच पद्धत प्रचलित आहे. हा साचा बनविण्याचं काम अत्यंत गुप्तपणे चाले. जवळजवळ १२ वर्षे हे गुपित राहिलं त्यामुळे आमचा व्यवसाय प्रगतीपथावर गेला. गणपती विकण्यासाठी दलाल नेमण्याची कल्पनाही राजाभाऊंचीच. त्यामुळे अल्पावधीत मुंबई-पुण्यापासून सोलापूर पर्यंत विक्रेत्यांची मालिका तयार झाली, आणि हा व्यवसाय चांगला स्थिरावला.

देवधर वाड्यापासून चालत पाच मिनिटांच्या अंतरावर 'प्रभात कलामंदिर' हे तीन मजली कलादालन आहे. तळमजल्यावर देवधर पितापुत्रांनी (राजाभाऊ व आनंद) गेल्या साठ वर्षात घडविलेल्या महर्षी व्यासांपासून कुसुमाग्रजांपर्यंत आणि ज्ञानेश्वरांपासून डॉ. हेडगेवारांपर्यंत अनेक प्रेक्षणीय मूर्ती आहेत. यातील व्यासांच्या डोळ्यातील धग अशी की, आपण दोन मिनिटेही पाहू शकणार नाही.

श्री. आनंद आपल्या पत्नीच्या सौ. विद्या यांच्या भूमिकेचं महत्त्व सांगताना म्हणाले, ''मूर्ती बनविण्याचं काम माझं. परंतु कच्च्या मालाची खरेदी, ऑर्डर्स घेणं, त्या वेळेवर पूर्ण होतील याकडे लक्ष देणं, कामगारांचा हिशेब ठेवणं, ग्राहकांना जोडून ठेवणं ही जबाबदारी विद्याची''

१९७४-७५ मध्ये देवधरांच्या कलादालनात

साडेसात ते आठ हजार गणपती तयार व्हायचे, पण जे. जे. मधून शिकून आलेल्या आनंद देवधर यांनी शिल्प बनविण्याकडे लक्ष केंद्रित केल्याने आता ही संख्या दीड-दोन हजारांपर्यंत सीमित झाली आहे.

आजतागायत ३०० ते ४०० जण देवधरांकडून मूर्तिकाम शिकून गेले आहेत. आनंद देवधर अभिमानाने सांगतात की, ''पेणमध्ये गणपतीचे जे तीनेकशे कारखाने आहेत त्या कुटुंबातील कोणी ना कोणी आमच्याकडे काम करीत होतं असं तुम्हाला आढळेल.आपल्या माणसाला मदतीचा हात देऊन सक्षम करण्याची देवधरांची परंपरा आजही सुरू आहे.''

यातील संतोष पाटील व त्यांची पत्नी अरुणा, राजाभाऊंच्या प्रोत्साहनाने स्वतंत्र व्यवसाय सुरू करणारे श्री. माधवराव फाटक व त्यांची दुसरी पिढी विजय व दीपक ही काही ठळक नावे.

गणेशमूर्तींसाठी पेणचे नाव अभिमानाने घेतले जाण्यात मोलाचा वाटा असणाऱ्या आपल्या या देवधर कुटुंबाचे मन:पूर्वक अभिनंदन.

***

## देवधर कुलबंधु-भगिनींना नम्र आवाहन

आपणास माहीत असेलच की आपला कुलवृत्तात मंडळाची वेब साईट www.deodharmandal.org वर टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. सध्या फक्त नामावली व जन्म / मृत्यूची नोंद, नाती व त्यांची नावे अशी नोंद आहे. प्रत्येक व्यक्तिची इतर माहिती भरणे चालू होणार आहे. त्याचप्रमाणे काही नवीन आलेली माहिती त्यांत घालण्याचे काम आता हाती घेतले आहे. ही वेबसाईट संपूर्ण जगात कधीही, कोणीही पाहू शकतो व कुलवृत्तांतातील माहिती वाचू शकतो. त्याचप्रमाणे त्यांत काही सुधारणा हवी असल्यास आपण कळवावे. त्या योग्य वाटल्यास व आक्षेपार्ह नसल्यास आम्ही त्या कुलवृत्तांतात संमीलित करू.

## वाटचालमध्ये आपला सहभाग

'आमची आहे प्रगतीची वाटचाल' ह्या त्रैमासिकासाठी साहित्य, कथा, कविता, पाठवू शकता. आपण केलेल्या प्रवासाचे वर्णन, विनोद, वगैरे पाठवू शकता. आपण केलेले विशेष कार्य, प्राप्त केलेले यश, आम्हास जरूर कळवा. तुम्हास प्रोत्साहन देणे, तुमच्या यशास प्रसिद्धी देणे हे आनंद देणारे आहेच व कर्तव्यपण. ते वाचून सर्वांस आनंदच होईल.

त्याचप्रमाणे आपल्या कुटुंबातील कोणी दिवंगत झाल्यास तसेच कोणाचे लग्नादि कार्य झाल्यास जरूर कळवावे. त्याचप्रमाणे वयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्याचे व लग्नाला ५० वर्षे पूर्ण झाल्याचे कळविल्यास त्यास प्रसिद्धी देऊन येणाऱ्या समारंभात आपला सत्कार करता येईल.

***

## कै. दिवाकर हनुमंत देवधर स्मरण लेखन स्पर्धेच्या निमित्ताने

आपल्या जून २०१६ च्या वाटचालच्या अंकात उद्योग व व्यवसायातील यशापयशाच्या अनुभवांविषयी लेखनस्पर्धा आपण घेतली होती. खूप उत्साहवर्धक नाही परंतु चांगला प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रातील काही व्यावसायिक बंधुभगिनींशी या निमित्ताने संपर्क झाला. काहींनी फोनवरच आपले अनुभव सांगितले. ''पहिली आहे ती नोकरी धड करून दाखवा मग धंद्याचा विचार करा'', ''कर्ज काढून अवलक्षण करून घेऊ नका म्हणजे मिळविली'' असे विचार शांतपणे पचवायची तयारी झाल्याशिवाय कोणी धंद्याचा विचार करू नये हे सुद्धा सांगितले. पण उपक्रम चांगला आहे असेही अनेकजण म्हणाले. कोल्हापूरच्या विद्यानंद देवधरांनी या उपक्रमासाठी देवधर मंडळाला भरघोस देणगी दिली. तिसऱ्या दिवशी अचानक सकाळी सकाळी फोन आला. फोनवर अध्यक्ष पी. जी. होते. त्यांनी सांगितले की बक्षिसासाठी कोणी स्पॉन्सर नाही मिळाला तर सर्व बक्षिसे माझ्याकडून.

तर आता पुढल्या अंकातील लेखन स्पर्धेविषयी. विषय आहे, 'आम्ही व आमचे कोकणातील गांव'. वयाची अट नाही. ६०० ते ८०० शब्दात लेख लिहा व आपले पूर्ण नाव, पत्ता व फोन नंबरसह खालील पत्त्यावर पाठवा. बक्षीस समारंभ आपल्या येत्या संमेलनात होईल.

अविनाश दिवाकर देवधर

२०२, लक्ष्मी विनायक सोसायटी, मंजुनाथ विद्यालयाशेजारी, पाथर्ली, डोंबिवली (पूर्व) ४२१२०१. फोन ९२२४२६४९६९.

### प्रथम पारितोषिक प्राप्त लेख

## लेखक : मंदार देवधर, पुणे

आमचं घर पुण्यातील एका मध्यमवर्गीयाचं घर. परिस्थिती बेतासबात. वर्गातील मारवाडी, गुजराथी व्यावसायिकांची मुलं चकाचक राहायची. त्यामुळे मी व माझा मोठा भाऊ आठवी-नववीत असताना आम्हाला नेहमी वाटायचे की आपला छोटामोठा उद्योग-व्यवसाय असला पाहिजे. दिवाळी वा उन्हाळ्याच्या सुट्टीचे वेध लागले की आम्ही उद्योगाच्या तयारीला लागायचो. आपण उदबत्या विकल्या तर महिनाभरात किती पैसे मिळतील व तेच तेवढ्या भांडवलात साबण व सुवासिक तेलं विकली तर किती पैसे मिळतील हे हिशोब रात्री अंथरुणावर पडता पडता होत असत. आपणाकडून कोणकोण माल विकत घेतील याची यादी पुन्हा पुन्हा मनात घोळली जायची. कालच्यापेक्षा आजच्या यादीतील घेणाऱ्यांची नावं वाढली तर कोण आनंद व्हायचा! आताही ते दिवस आठवले तर फार आनंद होतो.

आत्ताच्या मुलांना सगळं रडिमेड देऊन हा त्यांना मिळणारा आनंद आपण हिरावून घेत आहोत असं वाटतं. देवधर मंडळाने मुलांना प्रोत्साहन देण्याच्या निमित्ताने सुट्टीतील वस्तूविक्री स्पर्धा ठेवायला काहीच हरकत नाही. दिवाळीत उदबत्या, साबण, तेलं, उटणी, रांगोळीचे रंग, आकाशकंदिल, शुभेच्छापत्रे व विविध खाद्यपदार्थ, गणपतीत मोदक व आरास करण्यासाठी लागणारे साहित्य, संक्रांतीला

तीळगूळ व हलव्याचे दागिने, पतंग अशा कितीतरी गोष्टी सुट्टीत व सणसमारंभांच्या निमित्ताने विकता येण्यासारख्या आहेत. आम्ही काय विकलं नाही म्हणून विचारा.

नियमितपणे पैसे मिळावेत म्हणून आम्ही १९८५ ते १९८९ या काळात फ्लोराफाऊंटन या नावाने फुलदाण्यांची, पुष्पगुच्छांची लायब्ररी लक्ष्मीरोड परिसरात चालवीत होतो. त्यामुळे मार्केटयार्डची ओळख झाली. फुलांचे व्यापारी ओळखीचे झाले. त्या पाच वर्षात घरच्या गणपतीत फुलांची आरास जोरदार व्हायची आणि तीही चकटफू; याचा केवढा आनंद व्हायचा! काम वाढायला लागल्यावर हाताखाली काम करायला काही मुलं ठेवली. त्यांना सांभाळण्याचे तंत्रही हळूहळू आम्ही शिकायला लागलो. नकळत सहजपणे मॅनेजमेंटचे काही धडे आम्ही शिकलो. नवीन मेंबर्स खूप वाढले म्हणून हाताखाली जास्त मुले ठेवली. पसारा वाढला तसा अभ्यासावर परिणाम होऊ लागला. त्यावेळी घरच्यापैकी कोणीच मदतीला येऊ शकत नव्हते. आपल्याला झेपेल तेवढाच व्यवसायाचा व्याप वाढवावा हे सूत्र शिकायला मिळाले.

नंतर आजूबाजूच्या शेजारच्या ताई, काकू मावशी यांनी बनविलेल्या वस्तू विकायला सुरुवात केली. मैत्रिणीच्या आईने बनविलेले, घरगुती, अंडे न घातलेला केक, शेजारच्या वझे काकूंच्या घरगुती चॉकलेटपासून बनविलेल्या विविध वस्तू व त्या विकणाऱ्यांसाठी घरोघरी जाऊन लोकांच्या बर्थडेट्स कशा मिळविल्या आणि त्या मिळविण्यासाठी काय काय आयडिया लढविल्या हा एक निबंधाचा वेगळाच विषय होईल. ओकारेश्वराच्या मंदिराजवळील दत्ता जोगळेकरांच्या गणपती स्टॉलवर उभे राहून आम्ही वेगवेगळ्या आरासीसुद्धा विकल्यात. सॅटिन व वेलवेटच्या कापडाचे होलसेल व्यापारी त्यानिमित्ताने परिचित झाले.

उद्योगासाठी चिकाटी हवी, जिद्द हवी. कायम सावध व सतर्क हवे. हातात हात घालून काम करायची सवय हवी. कोणतेही काम करण्याची लाज वाटता कामा नये. न कंटाळता अनेक कामे करता आली पाहिजेत. नवनवीन शिकण्याची हौस हवी. प्रसंगी मानापमान बाजूला ठेवता आले पाहिजेत. काळाची पावले व परिसरातील होणारे बदल आधीच ओळखता आले पाहिजेत.

सांगायचे तात्पर्य उद्योग व व्यवसाय केले. त्यात शिकायला खूप मिळाले. जगाची वेगळी ओळख झाली. माणसे वाचता यायला लागली. अर्थाजन तर झालेच पण खूप मोठ्यांच्या ओळखी झाल्या. त्या ओळखीमधूनच परदेशातील जास्त उत्पन्न देणारी नोकरी मिळाली. गरज म्हणून आत्ता मी स्वीकारली आहे. पण लवकरच मी भारतात परतेन व एक स्थिरस्थावर व्यवसाय उभा करीन हे निश्चितच!

***

## दुसरे पारितोषिक प्राप्त लेख

# लेखिका :
# श्रीमती सुषमा शरद देवधर

*कै. शरद सदाशिव देवधर यांनी डोंबिवलीमध्ये 'देवधर इलेक्ट्रिकल्स' या नावाने १० वर्षे व्यवसाय केला. श्रीमती सुषमा देवधर यांनीही शरदरावांना व्यवसायात मदत केली आणि त्यांच्या पश्चात अजूनही त्या ही जबाबदारी शरद देवधरांचे स्मरण म्हणून पार पाडीत आहेत. त्यांच्याच शब्दात हे पुढील शब्दांकन -*

आमचे लग्न १९७२ साली झाले. तेव्हा ते रेल्वेमध्ये नोकरीला होते. तेथे त्यांनी पाच वर्षे नोकरी केली. परंतु तेथे त्यांचे मन रमेना. मराठी माणूस हा धंदा करू शकत नाही, व्यवसाय हा फक्त बनिया म्हणजेच गुजराथी, मारवाडी लोकांचाच असा आजूबाजूच्या लोकांचा समज. ज्याला व्यवसाय करावयाचा आहे किंवा करायची इच्छा आहे त्याने असा विचार करणे मुळातच चुकीचं आहे असे ते नेहमी म्हणायचे. आणि ते त्यांनी आपल्या कृतीने दाखवून दिले.

संकटकाळी कुठलेही आर्थिक पाठबळ नसताना नातेवाईकांची मदत नसताना त्यांनी स्वत:च्या मेहेनतीने प्रथम पागडी तत्त्वावर मानपाडा रोडवर एक गाळा भाड्याने मानपाडा रोडवर एक गाळा भाड्याने घेतला आणि व्यवसायाचा श्रीगणेशा केला. देवधर इलेक्ट्रिकल्स आणि प्लंबिंगचा उद्योग सुरू केला.

आठ दहा नोकर हाताशी ठेवले. त्यांना नियमित रोजगार मिळावा व त्यांचीही पंगती व्हावी यासाठी त्यांना वेळोवेळी प्रशिक्षण दिले. आपल्या अंगाच्या कर्तृत्व व कर्तबगारीने मोठ्या कंपन्या व बिल्डर्सचे कंत्राट मिळविले आणि आपल्या धंद्यात जोम बसवला. लाथ मारीन तेथे पाणी काढीन हा त्यांचा कणखर बाणा होता. कष्ट करून मोठे व्हा, नातेवाईकांकडून मदतीची अपेक्षा करू नका. आज डोंबिवलीत त्यांचे उद्योजक म्हणून नाव झाले आहे.

जनसंपर्क तर त्यांचा अफाट होता. दुकानात बसल्याबसल्या, आल्यागेल्यांची आस्थेने विचारपूस करणे. त्यांना आर्थिक मदत करणे. औषधोपचारासाठी मदत करणे या त्यांच्या सहजस्वभावामुळे ते डोंबिवलीत सगळ्यांना परिचित होते.

घरचे सर्वजण सांगायचे आता आपले व्यवस्थित झाले आहे. मुलामुलींची लग्न झाली आहेत. मुलगा स्वकर्तृत्त्वाने परदेशात गेला आहे. मुलगी शैक्षणिक क्षेत्रात स्वत:च्या पायावर उभी आहे. तर धावपळ व दगदग कमी करा. पण मरेपर्यंत ते आपल्या व्यवसायाशी एकनिष्ठ राहिले आहेत. मरेपर्यंत अखेरच्या क्षणापर्यंत दुकान व्यवसाय हाच त्यांचा श्वास होता आणि त्यांनी तो खरा करून दाखवत जगाचा निरोप घेतला.

***

# कुलवृत्तांताच्या नवीन आवृत्तीसाठी पुरवणी माहिती

(टीप : विवाह झालेल्या मुला/मुलींसाठी वेगळा फॉर्म वापरावा)

मजकूर पाठवितांना तो या क्रमाने येणे अपेक्षित आहे. या फॉर्मची झेरॉक्स काढून त्यावर भरून पाठविणे नाही.
कुटुंबातील प्रत्येक व्यक्तिचा वेगळा फॉर्म पाठवावा.

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कुलवृत्तांत पान नं.<br>घराणे |
| १) नांव | स्वत:चे | वडिलांचे/पतीचे नांव | आडनांव |
| माहेरचे नांव (महिलांसाठी) | स्वत:चे | वडिलांचे | आडनांव |
| २) वडिलांचे नांव | वडिलांचे | आजोबांचे | आडनांव |
| ३) पती/पत्नीचे नांव | नांव | वडिलांचे | आडनांव |
| ४) पती/पत्नीच्या वडिलांचे | नांव | वडिलांचे | आजोबांचे आडनांव |
| ५) पूर्ण पत्ता : घर नं.<br>तालुका<br>पिन | इमारत<br>जिल्हा<br>मोबाईल | रस्ता<br>राज्य | |
| ६) फोन नं. कार्यालय | | | घर |
| ७) जन्मदिनांक (........./........../..............) ठिकाण (गांव)<br>राज्य | | पिन | शहर<br>देश |
| ८) विवाहाची तारीख (........../.........../...............) | | | |
| ९) शिक्षण (दहावी / बारावी / पदवी वगैरे) | | | विद्यापीठ |
| १०) व्यवसाय | | | |
| ११) काही महत्त्वाच्या उपलब्धी (माहिती सविस्तर लिहावी) | | | |
| १२) इतर खास लिहिण्यासारखे (माहिती सविस्तर लिहावी) | | | |
| १३) अपत्य (मुलगा/मुलगी) नांव जन्म दिनांक (........../.........../..............) | | | |

फॉर्म पाठविण्याचा पत्ता :

सुरेश विश्वनाथ देवधर (कु.वृ.पान २१)
१०२, आय विंग, प्रणयनगर, राम मंदिर रोड (विस्तारित), बाभई, बोरिवली (प.) मुंबई ४०००९१, (महाराष्ट्र).
फोन : ०२२- २८९८१८५६ मोबाईल : ९२२३५०६९८८, ९२२३३६६६४० email : suresh.deodhar@gmail.com





सभेस संबोधित करताना उपाध्यक्ष श्री. सुरेश देवधर, बाजूला अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम देवधर व कार्यवाह सौ. सरिता देवधर




पुढील तीन वर्षासाठी निवडण्यात आलेली मंडळाची कार्यकारिणी




उपस्थितांचे स्वागत करताना
कार्यवाह सौ. सरिता मुकुंद देवधर




त्रैवार्षिक निवडणुकीचा निकाल
जाहीर करताना
निवडणूक अधिकारी
श्री. गणेश शंकर देवधर



विवाहाला पन्नास वर्षे पूर्ण झालेल्या दांपत्याचा सत्कार



सभेस उपस्थित कुलबंधू-भगिनी

संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक श्री. वा. ना. देवधर यांचेसाठी आतिथी संपादक श्री. आशिष देवधर यांनी साधना ऑफसेट, भारताचार्य वैद्य चौक, कल्याण येथे छापून, वैद्य वाडा, टिळक चौक, कल्याण (प.) ४२१३०१ येथे प्रसिद्ध केले.